
**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, कु. कविता पुरूषोत्तमराव घोडे विषयसाधनव्यक्ती या पदावर गटशिक्षणाधिकारी कार्यालय पंचायत समिती हिंगणघाट येथे कार्यरत असुन त्यांनी सादर केलेला **“आनंददायी उपक्रम क्षमतांचे विकसन”** हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष सन 2021-22 मध्ये त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित या पूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक:

स्थळ:



कार्यालय प्रमुखांची स्वाक्षरी
नाव: श्री. अशोक कोडापे
गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती हिंगणघाट

## प्रतिज्ञापत्र

मी कु. **कविता पुरूषोत्तमराव घोडे** प्रतिज्ञापत्र लिहुन देते की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला “आनंददायी उपक्रम क्षमतांचे विकसन” हा नवोपक्रम माझ्या स्वत:च्या शैक्षणिक उपक्रमावर, अनुभवावर आधारीत आहे. हा नवोपक्रम मला स्वत:ला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहिती च्या आधारे हा नवोपक्रम लिहीलेला नसुन या मध्ये मला जाणविलेल्या समस्याचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम या पूर्वीच्या राज्य स्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही तसेच इतर कोणत्याही व्यक्ती कडून लिहुन घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही तसे आढळून आल्यास तो copyright act 1957 खाली दाखल पात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक;

स्थळ:



स्पर्धेकाची स्वाक्षरी

नाव: कु. कविता पुरूषोत्तमराव घोडे

विषयसाधनव्यक्ती

पंचायत समिति हिंगणघाट

नवोपक्रमाचे शीर्षक

# आनंददायी उपक्रम क्षमतांचे विकसन

:सादरकर्ते:

कु.कविता पुरूषोत्तमराव घोडे

विषयसाधनव्यक्ती

गट साधन केंद्र हिंगणघाट

जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था, वर्धा

नवोपक्रम गट:- विषय सहाय्यक/विषय साधन व्यक्ती







**अनुक्रमणिका:**


1. प्रस्तावना
2. नवोपक्रमाची गरज व महत्व
3. नवोपक्रमाची उद्दिष्टे
4. नवोपक्रमाची व्याप्ती व मर्यादा
5. नवोपक्रमाचे नियोजन,कार्यवाही/वेळापत्रक.
6. नवोपक्रमाची प्रत्यक्ष कार्यवाही
7. नयोपक्रमाची यशस्विता, फलनिष्पत्ती
8. संदर्भसूची व परिशिष्टे
9. उपक्रमाचे पुरावे/ क्षणचित्र

# ऋणनिर्देश

कोराना जागतिक महामारीच्या काळात कोविड-19 च्या संसर्गजन्य परिस्थीतीमुळे संपुर्ण देशामध्ये भीतीयुक्त वातावरण तयार झाल्याने मुलांचे शाळेत येणे बंद झाले. शिक्षण व शाळा यांच्याशी असणारा संबंध नाहीसा झाला कारण शाळेत येणे लॉकडाऊन मुळे बंद झाले अशा परिस्थितीत मुलांचे शिकणे सुरू ठेवण्यासाठी अनेक शिक्षक व शिक्षण तज्ञांनी प्रयत्न केले तसेच अनेक उपक्रम चालविले व मुलांचे शिकणे सुरू ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला या सर्वांचा आधार घेऊनच तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वर्धा येथील प्राचार्य सन्मानिय डॉ. मंगेशजी घोगरे, तसेच मा. मधुमती सांगळे मॅडम, संपर्क अधिकारी, पंचायत समिती हिंगणघाट तथा अधिव्याख्याता जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले व प्रत्येकवेळी सहकार्य मिळाले.

मा. अशोकजी कोडापे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती हिंगणघाट, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख व विषयसाधनव्यक्ती पंचायत समिती हिंगणघाट व यांचे मनापासून आभार मानते.

हा उपक्रम ज्यांच्या सहकार्याशिवाय पूर्ण होऊ शकणार नव्हता असे सर्व शिक्षक व पालक याचे मनापासून आभार मानते.

# **श्रेयनामावली**

प्रमुख मार्गदर्शक - मा.डॉ. मंगेश घोगरे साहेब

प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा.

समन्वयक - मा.सौ.मधुमती सांगळे मॅडम

अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा.

प्रेरणास्त्रोत - मा. अशोक कोडापे साहेब

गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती हिंगणघाट

मा. श्री. अरविंद राठोड

गटसमन्वयक पंचायत समिती हिंगणघाट

मा.श्री. सुभाष टाकळे

विस्तार अधिकारी (शिक्षण)

सहकार्य- सर्व विषयसाधनव्यक्ती, शिक्षक पंचायत समिती हिंगणघाट

संकल्पना व निर्मीती सहाय्यक- कु. कविता घोडे

**प्रस्तावना**

कोराना जागतिक महामारीच्या काळात कोविड-19 च्या संसर्गजन्य परिस्थीतीमुळे शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये शाळा सुरू होऊ शकल्या नाही या कालावधीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या सर्वांनी सर्व स्तरावरून ऑनलाईन, ऑफलाईन इत्यादी माध्यामातुन विद्यार्थ्यांचे शिकणे सुरू राहण्यासाठी शासन स्तरापासून ते शिक्षकांपर्यंत अनेक प्रकारचे उपक्रम आयोजित केले परंतु काही विद्यार्थ्यांपर्यंत हे शिक्षण पोहचले पण काही विद्यार्थी त्यापासून वंचित राहिले ज्याप्रमाणे शिक्षक विद्यार्थी आंतरक्रिंया प्रभावीपणे होते तसे होऊ शकले नाही त्यामुळे प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले. विद्यार्थ्या मध्ये शिक्षणा बाबत उदासिनता निर्माण झाली. ही उदासिनता दूर करण्यासाठी “ आनंददायी उपक्रम क्षमतांचे विकसन” हा उपक्रम तयार करून विद्यार्थ्यांचे मूलभुत क्षमतांचे विकसन आनंददायी वातावरणात अध्ययन कृती करून पूर्ण करण्याचा प्रयत्न केला या उपक्रमात मराठी, गणित विषयातील इयत्ता 2 ते 5 च्या मुलांच्या मूलभुत क्षमता विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

पालकांची मुलांच्या शिकण्याच्या प्रक्रियेत असणारी महत्वाची भूमिका कारोनामुळे शाळाबंद कालावधीत निर्माण झालेल्या परिस्थितीत अधिकच महत्वाची ठरली व म्हणुनच पालकांना विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची जबाबदारी सोपवून झेरॉक्स स्वरूपात आठवड्याचे नियोजन देऊन शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या पाल्यांचा अभ्यास घेण्याची जबाबदारी सोपवण्यात आली या कार्यक्रमाची अमलबजावणी पंचायत समिती हिंगणघाट अंतर्गत येणाऱ्या वर्ग 1 ते 5 वी च्या सन 2021-2022 या वर्षातील पुढील इयत्तेत गेलेल्या सर्व विद्यार्थ्यांसाठी करावयाची आहे. शिक्षक व पालकांच्या मदतीने हा कार्यक्रम कार्यान्वीत करणे अपेक्षित आहे. संबंधित पर्यवेक्षकिय यंत्रणेने याबाबत योग्य ती कार्यवाही करणे अपेक्षित आहे. अशा प्रकारे शिक्षक, पालक, पर्यवेक्षकिय यंत्रणा व अधिकारी या सर्वांच्या प्रयत्नातुन विद्यार्थ्याचे शिकणे सुरू ठेवण्याचा एक छोटासा प्रयत्न “ आनंददायी उपक्रम क्षमतांचे विकसन” हा उपक्रम राबविण्यात आला.

## 1. नवोपक्रमाची गरज व महत्व:-

1. covid-19 या साथरोगाच्या पार्श्वभूमीवर शैक्षणिक वर्ष सन 2020-21 मध्ये शाळा सुरू होऊ शकल्या नाही. या कालावधीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे या करिता सर्वांनीच सर्व स्तरावरून ऑनलाईन, ऑफलाईन इ. विविध माध्यमातून विद्यार्थ्यांचे शिकणे सुरू रहावे या कारीता विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवुन ठेवता यावे. म्हणुन अनेक उपक्रम राबविले अपेक्षित अध्ययन निष्पत्ती साध्य व्हाव्यात तसेंच कृतीतील आनंद मिळावा व शैक्षणिक नुकसान काही प्रमाणात का होईना कमी करता यावे यासाठी या उपक्रमाची गरज जाणवली.

2. वेगळेपण: आनंददायी कृतीयुक्त उपक्रम क्षमतांचे विकसन हा उपक्रम कृतीवर आधारित आहे. ज्या कृती विद्यार्थ्याने करावयाच्या आहे, पालकाने करावयाच्या कृती व शिक्षकाने करावयाच्या कृती या प्रमाणे नियोजन करून कृती पत्रिकेच्या झेरॉक्स व PDF स्वरूपात प्रत्यक्ष व whatsapp group  वर देण्यात आल्या. त्यामुळे मोबईल नाही म्हणून विद्यार्थ्यांना कृती करता येणार नाही ही अडचण देखिल सोडविण्यात आली व पालकांनी आम्ही मुलांचा अभ्यास कसा घ्यावा याचे अगदी टप्प्या-टप्प्याने मार्गदर्शन पालक कृतीमध्ये दिले आहे. हे या उपक्रमाचे वेगळेपण आहे.

3. उपयुक्तता: या उपक्रमात विद्यार्थी प्रत्यक्ष कृती करणार आहे. पालक सुध्दा अवश्यकते नुसार विद्यार्थ्यांना सुचना देऊन कृती करून घेणार आहे अर्थातच विद्यार्थ्याने साध्य करावयाच्या अध्ययन निष्पत्ती उदा. पूर्ण वाक्यात बोलता येणे, सूचनेप्रमाणे कृती करणे, विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे, अनुभवलेले परिसरातील प्रसंग, अनुभव आपल्या शब्दात सांगणे हे सर्व साध्य होण्यास मदत होईल व विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर पडणार नाही. तर जोडून राहील, कृतीतील आनंद देखिल विद्यार्थ्याना अनुभवता येईल. तसेच इयत्ता 1 ते 5 च्या सर्वसाधारण अध्ययन निष्पत्ती साध्य होण्यास हा उपक्रम उपयुक्त आहे.

## 3. नवोपक्रमाचे उद्दीष्टे

1. विद्यार्थ्याचा व शाळेचा संपर्क नसल्यामुळे विद्यार्थ्याचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळणे.
2. विद्यार्थ्यांना कृतीतील आनंद देणे.

3. विद्यार्थ्याच्या वयोगटानुसार पालकांना कृती उपलब्ध करून देऊन विद्यार्थ्यांचे शिकणे सुलभ होण्यासाठी पालकांना साहाय्य करणे,

4. विद्यार्थ्यांमध्ये स्तरनिहाय अध्ययन निष्पत्ती काही प्रमाणात साध्य करणे.

## 4. नवोपक्रमाचे नियोजन

**I. उपक्रम पूर्वस्थितीचे निरिक्षण व तज्ञांशी चर्चा:**

लॉकडाऊन काळात covid-19 साथरोगाच्या भीती मुळे शाळा आणि विद्यार्थी यांच्यातला संबंध तुटल्या जात असल्याचे आढळले. मुलांना ज्या क्षमता प्राप्त झालेल्या होत्या त्यात देखिल मुले मागे जात आहे असे जाणवले. विद्यार्थी कालांतराने शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर तर पडणार नाही ना अशी परिस्थिती जाणवायला लागली ही संपूर्ण परिस्थिती पालक,शिक्षक,मुख्याध्यापक शाळा व्यवस्थापन समिती याच्याशी चर्चा केल्यानंतर आढळले. मुलांना जर शिक्षणाच्या प्रवाहात ठेवायचे असेल तर माध्यम हे पालकच असणार हे निश्चित झाले.

**II. आवश्यक साधनांचा विचार:**

online शिक्षण सुरू असतांना सर्व विद्यार्थ्यांना मोबाईल उपलब्ध नव्हते. काही पालक मोबाईल सोबत घेऊन कामावर जायचे तर कधी मोबाईल असला तरी रिचार्ज नसायचा तर कधी नेटवर्कची समस्या या सर्वच बाबींचा विचार करून whatsapp सोबतचे pdf व प्रत्यक्ष कृतीच्या आठवड्याच्या नियोजनाची झेरॉक्स पालकांपर्यंत पोहचविण्याचे ठरविले यातून सर्वच विद्यार्थ्यांपर्यंत पोहचता आले.

**4. करावयाच्या कृतीचा क्रम :** इयत्ता दुसरी ते पाचवी पर्यंत च्या विद्यार्थ्यासाठी श्रवण, भाषण-संभाषण, वाचन व लेखन तसेच गणितीय क्रिया व संख्याज्ञान याबाबतीत पूर्वज्ञान जागृतीवर आधारित कृती, खेळ, गाणी यांच्या माध्यमातून तसेच हा उपक्रम इयत्ता २ री पासून 5 वी पर्यंत असल्याने मागील इयत्तेतील

पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रमाचा समावेश करण्यात आला त्यामुळे पालकांना आपले पाल्य शिकत आहे याचा दिलासा मिळाला.

यानुसार आठवडा निहाय नियोजन करण्यात आले व सोमवार ते शुक्रवार भाषा व गणित या दोन विषयाच्या कृतीचा आराखडा (नियोजन) पालकांपर्यंत पोहचवून त्यात

| वर्ग | अध्ययन निष्पत्ती | विद्यार्थी कृती | पालक कृती | शिक्षक मार्गदर्शन |
|---|---|---|---|---|

या प्रमाणे आठवड्याचे नियोजन देण्यात आले व शनिवार ते रविवार भाषा व गणित विषयाची एकुण 10 गुणांची चाचणी झेरॉक्स स्वरूपात पालकांपर्यंत केंद्रप्रमुखांच्या सहाय्याने शिक्षकांकडे पोहचविण्यात आल्या व विद्यार्थ्यां कडून सोडवून शिक्षकांकडे गोळा करण्यात आल्या.

असे चार आठवडे सतत केल्या नंतर असे जाणवले की विद्यार्थ्यांची उपक्रम पूवीची स्थिती व सध्याची स्थिती यात खूप फरक आहे. विद्यार्थी आपली चाचणी घेतल्या जाते म्हणुन प्रत्येक कृती काळजीपूर्वक करतांना आढळले. हळूहळू ह्या कृती मुले एकट्याने न करता जवळच्या मित्राला घेऊन करतांना आढळले व कृतीतील आनंद अनुभवतांना आढळले. व्यक्त होवू लागले. विद्यार्थी-विद्यार्थी आंतरक्रिया व पालक-विद्यार्थी आंतरक्रिया तसेच साहित्य व विद्यार्थी याच्यात आंतक्रिया होतांना दिसून आले.


**III. कार्यवाहीचे टप्पे:**


सदर उपक्रम चार आठवडे राबविण्यात आला. 18 जून ते 14 ऑगस्ट असे नियोजन करण्यात आले. परंतु 28 जुन पासून सेतू उपक्रम असल्याने 18 जुन नंतर २ आठवडे हा उपक्रम सुरू ठेवून नंतर सेतू उपक्रमा नंतर 3 रा व 4 था आठवडा घेण्यात आला. पहिला आठवडा पूर्ण झाल्याच्यानंतर विद्यार्थ्यांना सोडविण्यासाठी प्रश्न पत्रिका देण्यात आली. सोमवार ते शुक्रवार दिलेला अभ्यास पूर्ण केल्यानंतर शनिवार, रविवार या दोन दिवसात विद्यार्थ्यांनी प्रश्न पत्रिका सोडवाव्या असे या उपक्रमाचे स्वरूप होते. पालकांना खालील प्रमाणे आठवडा निहाय नियोजन देण्यात आले. आनंददायी उपक्रम हा इयत्ता 2 ते 5 वी च्या विद्यार्थ्यांसाठी मागील इयत्तेचा विचार करून जुन्या पुस्तकातील आधार घेत कृती युक्त अभ्यास कशा प्रकारे घेण्यात यावा

याचे नियोजन पालकांना झेरॉक्स स्वरूपात देण्यात आले व विद्यार्थ्यांनी कोणत्या कृती कराव्या याचेही नियोजन कृती पत्रीकेत देण्यात आले. सोबतच शिक्षकांच्या कृतीची नोंद त्यामध्ये करण्यात आली. सदर नियोजन पुढील प्रमाणे कृती पत्रीकेच्या स्वरूपात पालकां पर्यंत इयत्ता निहाय व आठवडा निहाय पुरविण्यात आले.

(उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे)

## आठवड्याच्या अभ्यासक्रमावर आधारित प्रश्नपत्रिका





### पचायत सामता ाहगणघाट

आनंददायी उपक्रम

आठवडा:- तिसरा. वर्ग:- दुसरा

विद्यार्थ्याचे नाव-

शाळेचे नाव-

प्रश्न 1) झाडाला आठ पेरु होते.त्यातील तीन पेरु तुटुन खाली पडले तर झाडाला किती पेपर राहिले?

1.)3 2.)5 3.)4 4.) 8

प्रश्न 2). 9-5 = ( ) खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा.

1.) 3. 2.) 5. 3.) 4. 4.) 8

प्रश्न 3) खालील प्रश्न पाहून योग्य पर्याय निवडा.

6 पेन्सिली -1 पेन्सिल =

1.) 3. 2.) 0. 3.)1. 4.)2

प्रश्न-4)आईने पेटीतील नऊ आंब्यापैकी सईला दोन आंबे खायला दिले व राजला एक आंबा खायला दिला तर पेटीत किती आंबे राहिले.

1) 6 2.)7. 3.)5. 4.)4

प्रश्न 5) करोना पासून वाचण्यासाठी खालील पैकी कोणती गोष्ट करावी.

1.) मास्क वापरावे 2.) भरपूर पाणी प्यावे. 3) भरपूर जेवण करावे. 4.) जागरण करावे.

### पंचायत समिती हिंगणघाट

**आनंददायी उपक्रम**

वर्ग :-चौथा आठवडा:- तिसरा

विद्यार्थ्याचे नाव:-

शाळेचे नाव:-

प्रश्न 1 ला. गटात न बसणारा प्राणी कोणता ते सांगा.

1.) वाघ 2.)सिंह 3.)लांडगा 4)कुत्रा

प्रश्न 2.म्हशीच्या पिल्लाला काय म्हणतात?

1.)वासरु 2.)रेडकू 3.)सिंगरू 4.)कोकरु

प्रश्न 3. महाराष्ट्रात शेतीच्या कामासाठी कोणत्या प्राण्याचा उपयोग होतो?

1.)घोडा 2.)बैल 3.)उंट 4.) गाढव

प्रश्न 4. जशी कडब्याची पेंडी तशी लाकडाची.......

1)चळत. 2.) जोडी. 3.) गठ्ठा. 4.) मोळी

प्रश्न 5. माणसाच्या निवाऱ्याला घर तर सिंहाच्या निवाऱ्याला....

1)घर 2.)गुहा. 3.) गोठा 4.तबेला

**5. नवोपक्रमाची व्याप्ती व मर्यादा:**

सदर उपक्रम हा पंचायत समिती हिंगणघाट अंतर्गत येणाऱ्या इयत्ता 1 ते 5 वी च्या जिल्हा परिषद शाळांमधुन शिक्षणाऱ्या विद्यार्थ्यांपुरता मर्यादित आहे या उपक्रमाची व्याप्ती ईयत्ता 1 ते 5 मधील विद्यार्थ्यांच्या भाषा व गणित विषयापुरती आहे.

**वेळापत्रक**

| अ.क्र | आठवडा | दिनांक पासुन | दिनांक पर्यंत | चाचणी |
|---|---|---|---|---|
| 1 | पहिला | 14 जून 2021 | ते 18 जून 2021 | 19 जून 2021 ते 20 जून 2021 |
| 2 | दुसरा | 21 जून 2021 | ते 25 जून | 26 जून ते 27 जून |
| 3 | तिसरा | 28 जून | ते 2 जुलै 2021 | 3 जुलै ते 4 जुलै |
| 4 | चौथा | 5 जुलै 2021 | 9 जुलै 2021 | 10 जुलै व 11 जुलै 2021 |

**5) नवोपक्रमाची कार्यपध्दती**

1) पुर्वस्थितीचे निरीक्षण:

प्रश्नावलीच्या द्वारे पूर्व चाचणी घेऊन एकूण बारा केंद्रातील शाळांचे प्रतिसाद मागविण्यात आले. व त्यांच्या नोंदी घेण्यात आल्या. संकलन केले असता पहिली ते पाचवी च्या एकुण विद्यार्थ्यां पैकी 30 टक्के विद्यार्थी प्रतिसाद देऊ शकले ही प्रश्नावली प्रारंभिक स्वरूपांच्या क्षमतावर आधारीत असून सुध्दा मुले प्रश्नांचे उत्तरे देऊ शकत नव्हते.

मात्र आठवडा निहाय नियोजन पालकांना दिल्या नंतर विद्यार्थ्यांनी कोणती कृती करावी, पालकांनी त्यांच्याकडून कोणती कृती करून घ्यावी व शिक्षकांनी त्यांना कशा प्रकारे ऑनलाईन व ऑनलाईन शक्य नसल्यास ऑफलाईन मार्गदर्शन कसे करावे याचे नियोजन झेरॉक्स स्वरूपात व PDF स्वरूपात देण्यात आले. पर्यवेक्षकिय यंत्रणेद्वारे केंद्रप्रमुख, साधनव्यक्ती यांच्या द्वारे आढाव्या करीता प्रपत्र तयार करून उपक्रमाचा आढावा घेण्यात येऊ लागला त्यामुळे माहितीचे संकलन झाले.

**उपक्रम स्थितीचे निरीक्षण**

**उपक्रम पूर्व स्थितीच्या माहितीचे संकलन**

| अ.क्र | एकूण शाळा संख्या | उपक्रमात सहभागी शाळा संख्या | एकूण विद्यार्थी संख्या | सहभागी विद्यार्थी संख्या | एकुण सहभागी शिक्षक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 122 | 122 | 5206 | 3226 | 416 |

**उपक्रम पूर्ण झाल्यानंतर माहितीचे संकलन व निरीक्षणे**

| अ.क्र | एकूण शाळा संख्या | उपक्रमात सहभागी शाळा संख्या | एकूण विद्यार्थी संख्या | सहभागी विद्यार्थी संख्या | एकुण सहभागी शिक्षक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 122 | 122 | 5206 | 5206 | 416 |

**कार्यवाही करताना आलेल्या अडचणी**

1. पालकांची शिक्षणाप्रती असलेली अनस्था.

2. विद्यार्थ्यांचा शाळेशी तुटत असलेला संबंध.

3.एकाग्रता नसणे, शिक्षणाची आवड नसणे.

4. ऑनलाईन स्वरूपात शिक्षण घ्यायचे झाल्यास मोबाईलची उपलब्धता नसणे, नेटवर्कची समस्या.

5. शिक्षण क्षेत्रात होत असलेले विविध ऑनलाईन उपक्रम व त्याचा शिक्षकांना आलेला ताण अशा परिस्थीतीत हा उपक्रम कसा उपयुक्त आहे हे पटवून देणे व सकारात्मकता तयार करणे अशा अनेक अडचणी आल्या.

**6. नवोपक्रमाची यशस्विता**

1. “आनंददायी उपक्रम क्षमतांचे विकसन” या उपक्रमाच्या माध्यमातुन आनंददायी पध्दतीने खेळ व कृती मुलांकडून करून घेतल्यामुळे विद्यार्थी आपोआपच आनंददायी पध्दतीने शिक्षणाशी जोडल्या गेले त्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान काही प्रमाणात का असे ना कमी करता आले.

2. विद्यार्थ्यांना प्रात्याक्षिक करतांना कृती करतांनाच आनंद मिळाला.

3. वयोगटानुसार कृतीचे नियोजन झेरॉक्स स्वरूपात मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांचे शिकणे सहज व सुलभ होण्यासाठी पालकांना साहाय्यक झाले त्यामुळे आपली मुलं शिकत असल्याचे समाधान पालकांना मिळाले.

4. विद्यार्थ्या मध्ये पूर्ण वाक्यात बोलणे, आत्मविश्वासाने बोलणे, विचारलेल्या प्रश्नांचे आपल्या शब्दात उत्तरे देणे, परिसरातील घटना प्रसंग, अनुभव आपल्या शब्दात सांगणे, सहकाऱ्याच्या मदतीने आपले शिकणे पूर्ण करणे असे अनेक क्षमतांचे विकसन होण्यास या उपक्रमामुळे मदत झाली.

5. इयत्ता 1 ते 5 च्या विद्यार्थ्यांना अपेक्षित क्षमता या उपक्रमाच्या माध्यमातुन बऱ्याच अंशी प्राप्त झाल्या ही या उपक्रमाची यशस्विता आहे.

**7. समारोप:**

"आनंददायी उपक्रम क्षमतांचे विकसन" या उपक्रमामुळे इयत्ता 1 ते 5 मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सर्व साधारण अपेक्षित अध्ययन निष्पत्ती साध्य होण्यास मदत मिळाली तसेच भाषेच्या श्रवण, भाषण-संभाषण, वाचन व लेखन या क्षमतांचा देखिल विकास होण्यास मदत मिळाली व खालील प्रमाणे बदल दिसुन आले.

1. सुचनेप्रमाणे कृती करणे, गाणी गोष्टी ऐकणे, अनुभव सांगणे या बाबतीत विद्यार्थ्यांचा सहभाग वाढला.

2. आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना आपल्या शब्दात सांगु लागले.

3. अदांज, तर्क बांधणे, सहसंबंध जोडणे, मत व्यक्त करणे, या सारख्या क्षमता विकसित झाल्या.

4. ऐकलेल्या किंवा वाचलेल्या गोष्टीवर आधारीत प्रश्न विचारू लागले व विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर आपल्या शब्दात देऊ लागले,

5. गणन पुर्व तयारी साहीत्याच्या हाताळणी तुन झाल्याने विद्यार्थी आनंददायी पध्दतीने संख्याज्ञान प्राप्त करून हळूहळू संख्ये वरील क्रिया देखिल वस्तुच्या सहाय्याने करू लागले.

6. गणिताची भिती नाहीशी झाली.

7. शाळेतील शिकण्याबाबत प्रेरणा व उत्सुकता निर्माण झाली. विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वामध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्यास पालकांना सहाय्य झाले,

## संदर्भ सूची आणि परिशिष्टे


1. मुलभुत वाचन क्षमता विकसन प्रशिक्षण कार्यपुस्तीका

2. गणित संबोध प्रशिक्षण कार्यपुस्तीका.

3. भाषा व गणित साहित्यपेटी.

4. विद्यार्थी मित्र भाषा व गणित पुस्तिका,


**उपक्रमाचे पुरावे**



# उपक्रमाचे क्षणचित्र









